# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO


## गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८

## अधिसूचना

क्रमांक : १२५/२०१८ दि. २९/११/२०१८

**विषय :- कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१८**

सर्व सामान्यांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, विनियम क्र. २४/२००२ नुसार माजी आमदार द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून सुरू करण्यात आलेल्या **कै.नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१८** साठी **श्री. तुकाराम हरिभाऊ बिडकर,** राधे १२१, डॉ. मोरे हॉस्पिटल जवळ, रामनगर, अकोला ४४४००५ यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्री व त्यानुसार कार्य करणारे समाजसेवक **मा. श्री. तुकाराम हरिभाऊ बिडकर,** राधे १२१, डॉ. मोरे हॉस्पिटल जवळ, रामनगर, अकोला ४४४००५, यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले असून त्यासाठी आपले स्वतःचे संपूर्ण जीवन समर्पित केले आहे. त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१८'** घोषीत करण्यात आला आहे.

स्वा/
**(डॉ. अजय देशमुख)**
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्रमांक : १२६/२०१८ दिनांक : २९/११/२०१८

**विषय :- महाविद्यालय बंद करण्याबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेले महाविद्यालय बंद करण्याबाबतचा प्रस्ताव संस्थेकडुन प्राप्त झाला होता.प्राप्त प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा ,२०१६ मधील कलम १२१ च्या तरतुदीनुसार विव्दत परिषद व व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आला होता. विव्दत परिषद व व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानुसार सदर महाविद्यालय बंद करण्याच्या मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाचे, शासन पत्र क्र. एनजीसी-२०१८/(२०९/१८)/मशि-४, दिनांक ११.१०.२०१८ अन्वये खालील महाविद्यालय बंद करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविलेले महाविद्यालय शैक्षणिक सत्र २०१२-१३ पासून कलम १२१ च्या तरतुदीनुसार बंद करण्यात येत आहे.

**TABLE**

| अ.क्र | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व सांकेतीक क्रमांक | महाविद्यालयातील अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | त्रिशरण समाजसेवा मंडळ,श्रीरामपुर, ता.पुसद,जि.यवतमाळ. | ययातीभाऊ नाईक संगणकशास्त्र महाविद्यालय,श्रीरामपुर,ता.पुसद, जि.यवतमाळ.(४७९) | बी.सी.ए. |

स्वा/
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ